**<u>वादी तर्फे साक्षीदार क्रमांक ०१ नामदेव म्हसू मोहोळकर यांचा उर्वरित उलटतपास प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०६, ०८, १०, १२ ते १४ व २१ तर्फे विधिज्ञ श्री. ए. के. शेख यांचे मार्फत शपथेवर सुरु:–</u>**

**०१.** लक्ष्मण राजाराम मोहोळकर हे माझे चुलते आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सन १९८९ साली लक्ष्मण यांनी काही मिळकती विक्री केल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी दाव्यातील मागण्या वाचून पाहिल्या होत्या. माझ्या दाव्यामधील परिच्छेद क्रमांक १२ मधील मागणी "ब" मध्ये नमुद केलेला मजकूर म्हणजेच "*वादी नंबर १० कडून प्रतिवादी नंबर ०३ ते ०६ यांनी २१/०६/१९८९ रोजी करुन घेतलेले गट क्रमांक ५०९ चे खरेदीखत हे वादी नंबर ०१ ते ०६ चे अपरोक्ष व वादी नंबर ७, ८ चे वडील लक्ष्मण व वादी नंबर ९ यांचे अडाणीपणाचा गैरफायदा घेवून बिगर कब्जाचे पोकळीस्त असे करुन घेतलेले असलेने ते वादी नंबर १ ते ९ चे हिश्यावर बंधनकारक नाही असे ठरवून मिळावे*" हा खरा आहे. प्रस्तुतचा दावा दाखलकरण्यापूर्वी दिनांक २१/०७/१९८९ रोजी करुन दिलेले खरेदीखत हे रद्द करुन मागितले होते. सदर खरेदीखत रद्द करुन मागितल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा मी अभिलेखावर दाखल केलेला आहे.

**०२.** हे म्हणणे खरे नाही की, माझ्या चुलत्यांच्याशिवाय काही मिळकती हया मी विक्री केलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १६/०९/१९९८ रोजी मी व इतर पाच व्यक्तींनी मिळून दस्त क्रमांक १२१८/१९९८ या आन्वये नामदेव म्हसू मोहोळकर यांना जमीन विक्री केली आहे. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, सदरचे खरेदीखत हे चुकीचे झालेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सन १९९८ पासून ते प्रस्तुतचा दावा दाखल करेपर्यंत मी सदरच्या खरेदीखताबददल कोठेही हरकत नोंदविलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १६/०९/१९९८ रोजी मी व इतर पाच व्यक्तींनी मिळून रुक्मीणी नामदेव घाटोळे यांना जमीन विक्री केली आहे.

**०३.** हे म्हणणे खरे आहे की, सदरच्या खरेदीखतान्वये नामदेव दगडु घाटोळे व रुक्मीणी नामदेव घाटोळे यांचे फेरफार सदरी नाव नोंदणी करतांना मी हरकत घेतली होती. सदरच्या घेतलेल्या हरकती दाखविणारा कागदोपत्री पुरावा, मी प्रस्तुतचे प्रकरणात दाखल केलेल्या नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, सदरच्या कागदोपत्री पुरावा तलाठी यांनी मला दिला

नाही. सदरचे कागदपत्रे, जर मला मिळाली तर, मी प्रस्तुत प्रकरणात दाखल करण्यास तयार आहे.

**(प्रतिवादींचे सुविदय वकील श्री. ए. के. शेख यांच्या तोंडी विनंती वरुन उर्वरित उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात येत आहे.)**

श्रवणोत्तर स्वीकृती,
समक्ष,

सही/-

**(अनुश्री ब. फंड)**
सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
जामखेड.

दिनांक:- २८/०७/२०२५
ठिकाण:- जामखेड